साखळी पध्दतीने सिमेंट कॉंक्रीट नाला बांध कार्यक्रम: मूल्यमापनाबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**जलसंधारण विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांकः जलसं-२०१२/प्र.क्र.६५/जल-७**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
तारीख: ३ जून, २०१३

**<u>शासन परिपत्रक :</u>**

भूगर्भातील पाण्याची पातळी वाढविणे, संरक्षित सिंचनाची सोय, जनावरांचा व माणसांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविणे, उत्पादनात वाढ व रोजगार निर्मिती करणे हे उद्देश साध्य करण्याकरिता सन २०१२-१३ पासून साखळी पध्दतीने सिमेंट कॉंक्रीट नाला बांध बांधण्याचा कार्यक्रम राज्यात विविध योजनांमधून राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत बांधण्यात आलेल्या सिमेंट नाला बांधामुळे होणारे फायदे विचारात घेऊन मूल्यमापन (Evaluation) करण्यात यावे. मूल्यमापन (Evaluation) प्रचलित मुद्यासोबत प्रमाणकांचे Standards खालील मुद्दे विचारात घ्यावेत :

१) पाण्याच्या भूजल पातळीत झालेली वाढ : विहिरीची पाण्याची पातळी,

२) विहिरी कोरडया होण्याच्या कालावधीतील बदल,

३) पाण्याच्या स्त्रोताचे बळकटीकरण केल्यावर पाण्याच्या उपलब्धतेत झालेली वाढ,

४) फळबाग, वृक्ष लागवड याखाली अतिरिक्त क्षेत्र आले किंवा कसे,

५) पिकांच्या पध्दतीत (Cropping Pattern) झालेला बदल/ क्षेत्रात वाढ,

६) कृषि उत्पादनात झालेली वाढ,

७) चारा व जळाऊ लाकूड यांच्या उपलब्धतेत वाढ/ बदल,

८) पशुधनात झालेली वाढ/ बदल,

९) रोजगार निर्मिती,

१०) शेतकऱ्यांचे वैयक्तिक उत्पन्न वाढले किंवा कसे,

**अहवाल सादर करणे :**

या कार्यक्रमांतर्गत बांधण्यात आलेल्या सिमेंट नाला बांधाबाबत खालील माहितीसह अहवाल शासनास सादर करावा :

१) काम पूर्णत्वाचे (Completion Certificate) / खर्चाबाबत उपयोगिता प्रमाणपत्र (Utilization Certificate).

२) प्रस्तावित कामाचे काम करण्यापूर्वी व काम झाल्यानंतरचे छायाचित्र.
३) यशोगाथा.

२. सिमेंट नाला बांधाचे अक्षांश, रेखांश, शेतीचा गट नंबर, अपेक्षित पाणी साठा व खर्च याबाबतचा गोषवारा देण्यात यावा.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१३०६०३१५४५४००२२६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sunil Sahebrao Chavan

Digitally signed by Sunil Sahebrao Chavan
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=RDD & WATER CONSERVATION DEPT, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Sunil Sahebrao Chavan
Date: 2013.06.03 16:56:01 +05'30'

(सुनील चव्हाण)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे खाजगी सचिव,
२. मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
३. मा.उप मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४. मा.मंत्री (जलसंधारण) यांचे खाजगी सचिव,
५. मा.राज्यमंत्री (जलसंधारण) यांचे स्वीय सहाय्यक,
६. सर्व मा.मंत्री/ मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
७. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे स्वीय सहाय्यक,
८. अपर मुख्य सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई,
९. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव , मंत्रालय, मुंबई,
१०. अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग (मदत व पुनर्वसन), मंत्रालय, मुंबई
११. विभागीय आयुक्त (सर्व),
१२. संचालक (मृदसंधारण), कृषि आयुक्तालय, पुणे-४११ ००१,
१३. मुख्य अभियंता, लघु पाटबंधारे (स्थानिकस्तर), पुणे,
१४. प्रधान मुख्य वनसंरक्षक व महासंचालक, सामाजिक वनीकरण,महाराष्ट्र राज्य, पुणे,
१५. संचालक, महाराष्ट्र सुदूर सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे,
१६. संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे,
१७. मुख्य कार्यकारी अधिकारी, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे,

१८. अपर मुख्य कार्यकारी अधिकारी, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे,
१९. महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मुंबई (प्रसिध्दीकरीता),
२०. सर्व जिल्हाधिकारी,
२१. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी/ अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
२२. महालेखापाल १/२, महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर (लेखा परीक्षा व लेखा व अनुज्ञेयता),
२३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
२४. निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई,
२५. सर्व उपायुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय,
२६. सर्व विभागीय कृषि सहसंचालक,
२७. सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,
२८. सर्व कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे (स्थानिकस्तर),
२९. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
३०. सर्व मंत्रालयीन विभाग,
३१. सर्व उप सचिव/अवर सचिव/कार्यासन अधिकारी,ग्रा.वि.व ज.सं.विभाग, मंत्रालय, मुंबई,
३२. नियोजन विभाग/ वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
३३. कार्यासन.जल-११, ग्रा.वि.व ज.सं.विभाग, मंत्रालय, मुंबई,
३४. जल-७, निवड नस्ती.